प्रकरण ५ वे

# ''सातारा येथील वैदुंचे बदलते जीवन''

## प्रकरण 5 वे

## सातारा येथील वैदुंचे बदलते जीवन

या प्रकरणामध्ये सातारा शहरातील वैदु जमातीच्या केलेल्या सामाजिक सर्वेक्षणामधून मिळविलेली माहिती सारांश रूपाने मांडलेली आहे. यामध्ये त्यांच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवनाविषयीची माहिती असून तिची विभागणी खालील प्रमाणे केली आहे.

अ) लोकसंख्यात्मक वैशिष्ट्ये

आ) राहणीमान

इ) शैक्षणिक जागृती

ई) आर्थिक क्रिया

उ) सामाजिक, सांस्कृतिक मूल्ये, परंपरा, रीतीरिवाज इ.

ऊ) अभ्यासाचे निष्कर्ष

ए) वैदुंची सद्यःस्थिती

### (अ) लोकसंख्यात्मक वैशिष्ट्ये ...

ही जमात सातारमध्ये 1935 च्या दरम्यान आलेली आहे. हे लोक आंध्र, कर्नाटकातून आले आहेत, हे त्यांच्या तेलगु मातृभाषेवरून सिध्द होते. 1901 ते 1931 च्या ' जनगणना - अहवाल - सातारा शहर ' यामध्ये या जमातीचा उल्लेख नाही. सुरूवातीला ' वरगंटटोळ ' या आडनांवाचा एक गुंफ ( तांडा ) आला. त्यानंतर फलटणमधून ' कोंडजोगळे ' या कुलाचे लोक तिथे आले. सातारमध्ये सुरूवातीस यांनी ' रहिमतपूर सातारा रोड ' व पुणे बंगलोर रोड यांच्या क्रॉसिंगला सध्याच्या ' अजिंठा हॉटेल ' शेजारी यांनी वस्ती केली. कर्नाटकातून येताना हे लोक ' येरूकेरू - धारवाड - हुबळी - संकेश्वर - बदामी - विजापूर - मिरज - सांगली - कोल्हापूर या मार्गाने जंगलातून आले व सातारमध्ये स्थायिक झाले. सातारा शहराभोवती डोंगराळ भाग असून या डोंगरामध्ये औषधी वनस्पती मिळत होत्या. शिकार करणे शक्य होते. उपजीविकेची निश्चित खात्री होती म्हणून हे सातारा शहराजवळ स्थायिक झाले. जातवाले होते म्हणून फलटण मधून ' कोंडजोगळे ' या कुळाचे लोकही येथे येऊन राहू लागले. 1942 च्या प्लेगमध्ये या जमातीचे अनेक लोक मेले. म्हणून ही जागा अपशकुनी समजून या जमातीने जरंडेश्वर नाक्याच्या उत्तर पूर्वेस सध्याच्या

' भीमाबाई आंबेडकर समाधी ' च्या जागेत स्थलांतर केले. त्यावेळी या लोकांकडे मरीआई, जगदंबा, दुर्गादेवी, शंकर, गुरूड, पीर, कुत्री यांच्या मूर्ती होत्या. यामध्ये काही मूर्ती, देवाचे टाक हे सोन्या चांदीचे असून त्यांचे वजन अर्धा किलो, किलोभर होते असे हे लोक सांगतात. या मूर्ती ते पत्र्याच्या पेटीत ठेवत होते. एकदा वडारी - टकारी या गुन्हेगारी जमातीने त्यांच्या या मूर्ती चोरून नेल्या. तेव्हां ही जागा पण अपशकुनी आहे असे समजून या लोकांनी कामाठीपुरा भागांत आपली वस्ती केली. सध्या ते याच जागेत रहातात. या जागेतील निम्मी जागा त्यांनी 500 रूपयास विकत घेतली. कांही जागा सरकारकडून मिळाली. सातारमध्ये वार्ड क्र. ।। मध्ये हे लोक रहात आहेत. यांची लोकसंख्या 447 इतकी आहे. त्यांच्यामध्ये पुरूषापेक्षा स्त्रियांचे व मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण जास्त असलेले दिसते.

(आ) राहणीमान ...

१. घरे ... सुरूवातीस हे लोक ' पाला ' मध्ये रहात होते. गवताच्या सरळ काडया एकत्र करून त्याची चटई बनवित. तीन चार बांबू वाकडे, अर्धगोलाकार लावून त्यावर ती चटई पसरीत. झोपडी भोवती पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी ' चर ' खणत असत.

सध्या हे लोक पत्र्याच्या घरात रहातात. ही घरे त्यांच्या मालकीची आहेत जमातीत पाच घरे पक्क्या विटांची व पत्र्याचे छत असणारी आहेत. इतर घरे भिंती पत्र्याच्या व छतही पत्र्याचे अशा स्वरूपाची आहेत. या वसाहतीमध्ये सार्वजनिक संडास, सार्वजनिक पाणी पुरवठा आहे. वीज बत्ती आहे. झोपडपट्टीत बंदिस्त गटारे नाहीत.

2. वेशभूषा ... या जमातीत पूर्वी स्त्रिया धोतर साडीसारखे नेसत व पांढरीच चोळी वापरीत असत. पुरूष धोतर लुंगीसारखे गुंडाळीत. शर्ट घालीत व डोक्याला मुंडासे बांधत.

या लोकांच्या पारंपरिक वेशभूषेमध्ये फरक झाला आहे. सध्या स्त्रिया साडी, गरारा व विविध प्रकारचे कपडे वापरतात. पुरूष पॅंट शर्ट, धोतर शर्ट, पायजमा घालतात. त्यांचा व्यवसाय ' कटलरीचा ' असल्याने कृत्रिम दागिने, सौंदर्य प्रसाधने यांचा स्त्रिया वापर करतात... या जमातीत रेडिओ, टेपरेकॉर्डर, टी.व्ही. अशी करमणुकीची साधने कांही जणांकडे आहेत. एका कुटुंबामध्ये व्ही.सी.आर. फ्रीज आहे. बारा जणांकडे टी.व्ही. आहे. कांही लोकांच्या घरांमध्ये भांडयाची कपाटे,

टीपॉय, लोखंडी कॉटस् अशा वस्तू आहेत. हे लोक चूल किंवा स्टोव्हचा स्वयंपाकासाठी वापर करतात.

3. **जेवण** ... सुरूवातीस हे लोक मांसाहारी होते. किरकोळ वस्तू विकून मिळालेले अन्न किंवा धान्य ते खात असत. शिकार करून उपजीविका करीत होते. आता हे लोक जेवणांमध्ये मांस, सुके मासे, अंडी, बाजारात मिळणारा भाजीपाला, भाकरी चपाती, भात, मासे, खेकडे इ. पदार्थ खातात.

(इ) **शैक्षणिक जागृती** ...

या जमातीमध्ये 1935 पासूनच शैक्षणिक जागृती झाली आहे. त्या काळात ख्रिस्ती मिशन-यांच्या शाळेमध्ये स्त्रिया व पुरूष जात होते. मिशनरी लोक त्यांना कपडे व पोटभर अन्न देत यामुळे हे लोक त्यांच्या शाळेत जात होते. या जमातीत स्त्री व पुरूष दोघांमध्ये साक्षरता आढळते. कुटुंब प्रमुखामध्ये साक्षर व निरक्षर कुटुंब प्रमुख आहेत. 1975 ते 1978 या काळांत जमातीमध्ये जमातीचे कार्यकर्ते ' प्रौढ शिक्षण वर्ग ' चालवित होते. 1978 नंतर तो बंद पडला. या जमातीमध्ये शाळेत जाणारी मुले मुली आढळतात. जमातीत बालवाडी आहे. सरकारकडून मिळणा-या शैक्षणिक व नोकरीविषयक सवलतींची यांना माहिती आहे. जमातीचे कार्यकर्ते यांना याबद्दल मार्गदर्शन करतात.

(ई) **आर्थिक क्रिया** ...

1. **पारंपरिक व्यवसाय** ... बदलत्या सामाजिक जीवनांत व जंगलातून स्थलांतर करीत असताना या लोकांनी जंगलापासून मिळणा-या वस्तूंवर आपली उपजीविका केलेली दिसते. यामध्ये त्यांनी शिकार करणे, औषध तयार करून विकणे इ. व्यवसाय स्वीकारले. याशिवाय मणि पोत विकणे, न्हाव्याच्या वस्त-याला धार लावून देणे इ. व्यवसाय ते करीत होते.

**अ. औषध विक्री** ... या लोकांना औषधाचे शास्त्रशुध्द ज्ञान नाही. विषारी नसणा-या, खाण्यास योग्य अशा सर्व वनस्पती वाळवून, कुटुन त्याचे चूर्ण किंवा गोळया यांचा ते औषध म्हणून वापर करीत. या वनस्पती त्यांना जरंडेश्वराच्या डोंगरांत मिळत असत. सांधेदुखी, कानदुखी, पोटदुखी, वात विकार इ. वर ते औषध उपचार करीत असत. पोटदुखीवर सोडा, लिंबू, गूळ, चुना एकत्र करून देणे, सांधेदुखीवर निर्गुडी, पपईच्या पानांचा वाफारा देणे, नायटा गजकर्ण, इसब यावर बिबा,

कडुजिरा, शेराची पाने व दारूगोळा एकत्र भिजवून वाटणे व त्याचा लेप जखमेवर देणे इ. औषधोपचार ते करत. जंगलातून मारून आणलेल्या पशु, प्राण्यांच्या चरबीचे तेल मालिशसाठी वापरत असत. या लोकांनी कोल्हापूरच्या शाहू महाराजांना औषध दिले होते म्हणून यांना ' राजवैदु ' असे म्हणतात.

ब. तुंबडी लावणे ... जखम किंवा पायावर होणा-या गाठीमधून अशुध्द रक्त हे लोक तुंबडी किंवा जळवांचा वापर करून काढून टाकत. आजही जमातीत एक म्हातारा वैदु ' तुंबडी लावण्याचा ' व्यवसाय करताना आढळतो.

वैद्यकीय विकासामुळें वैदुंचे वरील दोन्ही व्यवसाय कमी प्रमाणांत चालतात.

क. शिकार करणे ... जंगलामध्ये औषधी वनस्पती शोधत असताना उपजीविकेसाठी या लोकांनी जंगली प्राण्यांची शिकार करणे सुरू केले. जंगलातील लांडगा, कोल्हा, तरस, मुंगूस, रानमांजर, खोखड, गावातील मांजर, रानउंदीर, नदीतील सुसर, मगर आणि रानडुक्कर यांची शिकार करू लागले. मगरीची शिकार करणे हे अभिमानास्पद समजत होते. शिकार विविध पध्दतीने केली जात असे.

1. डुकराची शिकार ... डुकराची शिकार सामूहिकरित्या केली जाई. दहाबारा लोक एकत्र मिळून शिकार करीत असत. जंगलामध्ये डुक्कर शोधून काढल्यानंतर दोन गट करून डुकराच्या पुढे मागे दबा धरून बसत. एक गट डुकराला आरडा ओरडा करून घाबरवून सोडत असे. डुक्कर पुढे पळाले कीं दुसरा गट त्याला जाळयात पकडीत असे. पकडलेल्या डुकराला काठी, लोखंडी पहार अथवा भाल्याच्या साह्याने ठार केले जाई. मारलेला डुक्कर विस्तवावर भाजून, सोलून त्याचे मांस जमातीत वाटले जात असे.

हे लोक डुकराची शिकार करण्यासाठी पेशव्यांना मदत करीत होते. जमातीत काही लोक डुकराच्या पावलांवरून जनावर एकटे आहे की कळप आहे, नर व मादींची संख्या, पिलांची संख्या इ. ओळखाण्यात तरबेज होते. या कौशल्यामुळे पुण्यातील वैदुंना हडपसरची जागा बक्षिस म्हणून मिळाली आहे. तेथील कांही वैदु कुटुंबे ही जागा सोडून सातारमध्ये रहावयास आली आहेत.

2. धुरी देणे ... बिळात रहाणा-या ससे, मुंगुस, तीतर, उंदीर इ. प्राण्यांची शिकार करण्यासाठी हे लोक बिळाच्या तोंडाशी विस्तव पेटवून धूर करीत. गुदमरून बाहेर

पडणा-या प्राण्यांची शिकार केली जाई. हे लोक रात्री जंगलामध्ये वस्ती करीत नसत. मृत पशु अथवा पक्षाचे मांस मीठ लावून पाण्यात शिजवून खाण्याची पध्दत होती.

3. <u>सुसर, मगर यांची शिकार</u> ... सुसर व मगरीची शिकार भाला, गळ, कुत्री व लोखंडाच्या पहारीच्या सहाय्याने केली जात असे. शिकारीसाठी ' कुत्रा ' या प्राण्यास वैदु जमातीत महत्व मिळाले. ज्या वैदुजवळ जास्त कुत्री तो श्रीमंत समजण्याची पध्दती या जमातीत होती.

याचवेळी काही व्यापा-यांशी संपर्क आल्याने वैदुंनी डुकराचे केस, चामडी, इतर प्राण्यांची चामडी विकण्याचा व्यवसाय सुरू केला. नंतरच्या काळांत शिकारीस बंदी घातली गेली. वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे वैदुंचा शहरात व ग्रामीण भागात चालणारा औषध विक्रीचा व्यवसाय चालेनासा झाला. तेव्हां उपजीविकेसाठी त्यांना इतर व्यवसाय शोधावे लागले.

* **<u>वैदुंचे बदलते व्यवसाय</u>** ...

या जमातीच्या लोकांनी बदलत्या सामाजिक जीवनांत उपजीविकेसाठी पारंपरिक व्यवसाय बंद केलेले दिसतात. सध्या या लोकांमध्ये नोकरी, कटलरी व्यवसाय, रिक्षा व्यवसाय, गवंडीकाम, दुकानदारी, बॅग दुरूस्ती, स्टोव्ह दुरूस्ती, टीनमेकर, भीक मागणे, आचारी काम करणे, बेकरीचे ट्रे तयार करणे, इ. व्यवसाय आढळतात. यामध्ये कटलरी व्यवसायाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. स्त्रिया नोकरी व कटलरी व्यवसाय करतात. नोकरी करणा-या स्त्रिया या शाळेत शिक्षिका आहेत. जमातीमध्ये पंधरा जणांकडे ' शिवण मशीन ' आहेत.

1983 मध्ये ' शिवाजी कॉलेज, सातारा ' या महाविद्यालयातील समाज शास्त्राच्या शाखेच्या विद्यार्थ्यांनी या जमातीचा समाजशास्त्रीय अभ्यास केला. त्यावेळी या जमातीत टीनमेकर .. 40 मणी फेरीवाले .. 2, रिक्षाचालक .. 2, स्टेशनरी स्टॉल ..4, सुटकेस दुरुस्ती ..1, औषधविक्री..4, मजुरी .. 2, नोकरदार .. 4, असे व्यवसाय करणा-यांची संख्या आढळली. नोकरदारांमध्ये एक माध्यमिक शिक्षक व तिघे पोलीस कॉन्स्टेबल होते.

या जमातीस 1983 नंतर बॅंक ऑफ बरोडा, महाराष्ट्र बॅंक या बॅंकामार्फत 1,000 रुपयांपर्यंत कर्ज देण्यात आले. व्यावसायिक सुधारणेसाठी या पैशाचा वापर केलेला आढळतो. ही कर्जे या जमातीने फेडली आहेत. सावकार किंवा अन्य स्वरूपाची कर्जे त्यांनी काढलेली नाहीत. जमातीत

" गृहनिर्माण सोसायटी ' स्थापन झाली आहे. ती रजिस्टर्ड असून सध्या 46 घरे बांधण्याचा परवाना जिल्हाधिका-यांकडून तिने मिळविला आहे.

एकंदरित सातारमध्ये सध्या या जमातीत पुढील व्यवसाय सुरू आहेत ...

1. बेकरीसाठी ट्रे तयार करणे, 2. एस टी महामंडळातील कंडक्टर लोकांच्या पेटया तयार करण्याचे कंत्राट घेणे, त्या दुरूस्त करणे, 3. गोदरेजची कपाटे तयार करणे / दुरूस्त करणे, 4. लॉक रिपेअरिंग करणे. 5. रिक्षा चालविणे, 6. मणि पोत, कृत्रिम दागिन्यांचे स्टॉल्स चालविणे, 7. शासकीय निमशासकीय नोकरी करणे, यामध्ये शाळेत शिक्षक, शिपाई इ. व्यवसाय आहेत.

### (उ) सामाजिक, सांस्कृतिक मूल्ये, परंपरा रितीरिवाज इ.

सातारमधील वैदु स्वतःस हिंदु धर्मीय मानतात. हिंदु धर्मातील सवर्णियांशी ते रोटी व्यवहार करतात. कर्नाटकमध्ये असताना हे लोक देवपूजा करीत नव्हते. कर्नाटकमध्ये ' करवट ' या गांवी शंकराचार्यांच्या शिष्यांनी या लोकांना दीक्षा देऊन देवदेवतांची पूजा करण्यास सांगितले. त्यानंतर हे लोक शंकर, लक्ष्मी, दुर्गादेवी इ. देवतांची पूजा करू लागले. पूजा पाठ, प्रार्थना, उपास करणे, व देवतांना प्राण्यांचा बळी देणे इ. प्रकारांनी ते देवतांची पूजा करतात असे जमातीच्या काही लोकांच्या मुलाखातीवरून कळून येते.

या लोकांमध्ये ' संचीवाले ' व ' झोळीवाले ' अशा दोन उपजाती आहेत. ' संचीवाले ' वैदुंचे प्रमाण येथे जास्त आहे. त्यांच्यामध्ये ' वरगंटटोळ ' ' गुडीलोळ ', ' शिवरलोळ ' 'करनटटोळ' 'कोंडजोगळे' अशी आडनांवे आहेत. ' वरगंटटोळ ' चा अपभ्रंश ' वरगंटे ' व ' गुडीलोळ ' चा अपभ्रंश गुडीले होऊन सध्या ' वरगंटे ' व ' गुडीले ' ही आडनावे प्रचलीत झाली आहेत. याशिवाय त्यांच्यामध्ये शिर्के, शिंदे, पाटील, वैदु ही प्रगत समाजातील आडनावे आढळतात.

या जमातीत पुढील विधी आढळतात ...

**1. जन्म, बारसे, पाचवी इ. प्रथा ...**

या जमातीमध्ये ' मुलगा ' असणे महत्वाचे आहे. तो वंशाचा दिवा समजला जातो. बाळाचे नांव तिस-या किंवा पांचव्या दिवशी ठेवले जाते. बाळाच्या जन्मानंतर बाळाचा पिता जमातीस ' कास ' देतो. कास म्हणजे ' खुशी देणे '. आपल्या ऐपतीप्रमाणे जमातीस दारू पाजणे व मटणाचे जेवण देणे याला ' कास देणे ' म्हणतात.

मुलाच्या जन्मानंतर तिस-या किंवा पाचव्या दिवशी ' पालपडी ' हा विधी करतात. यादिवशी भात अथवा भाकरीच्या चु-यामध्ये तेल अथवा तूप, साखर अथवा गूळ घालून त्यांच्या मुदी तयार करतात. जमातीमधील छोटी मुले बोलावून त्यांना या मुदी दिल्या जातात. नंतर सर्वजण मुलाचे नांव घेऊन त्याच्या आईस दूध येऊ दे ' पालपडी ' असे जोराने ओरडतात. या पध्दतीने मुलाचे नांव ठेवतात.

पाचव्या दिवशी मुलाला सुपात ठेऊन त्याच्या कमरेस काळा दोरा बांधतात. या जमातीत मुलाचा जन्म झाल्यानंतर त्याच्या पित्याने स्वतः मांजर मारून जमातीस जेवण देण्याची प्रथा होती.

सध्या या जमातीत प्रगत समाजासारखा बारशाचा विधी केला जातो. गोड जेवण दिले जाते.

**लग्न पध्दती** ...

या जमातीत एकाच गोत्रातील समान आडनांवाच्या लोकात विवाह होत नाही. आते मामे भावंडांचा विवाह प्रचलित आहे. त्यास ते ' होळ ' म्हणतात.

1. **बाल विवाह** ... या जमतीत स्त्री गरोदर असताना गर्भातील बालकाचे लग्न ठरविले जात असे. किंवा मुलगा व मुलगी आठ ते दहा वर्षांचे असताना लग्न केले जाई. आता अशी पध्दत दिसून येत नाही.

2. **पुनर्विवाह** ... या जमातीत स्त्री व पुरूष दोघांना पुनर्विवाह करता येतो. यास ' म्होतुर ' म्हटले जाते. पुनर्विवाहित स्त्रिस सामाजिक व धार्मिक कार्यांत भाग घेता येत नाही.

3. **बहुविवाह** ... या समाजात एक पुरूष अनेक स्त्रियांशी लग्न करू शकतो. जमातीमध्ये याचे एकच उदाहरण आढळले. सामाजिक कार्यकर्त्यांनी ही पध्दत बंद केली आहे.

4. **घटस्फोट** ... या समाजात ' स्त्री ' किंवा ' पुरूष ' दोघे ही काडीमोड घेऊ शकतात. ' नवरा दारू पितो अथवा मारहाण करतो ' इ. कारणांसाठी स्त्री घटस्फोट घेऊ शकतो. घटस्फोटास जमातीकडून लवकर परवानगी दिली जात नाही. जातपंचायत नवरा बायकांमध्ये दिलजमाई करण्याचा प्रयत्न करतात.

5. **वधुमूल्य प्रथा** ... ही जमात आदिम जमात आहे. लग्नामध्ये मुलाचा पिता मुलीस मागणी घालतो. 1971 ते 1981 या काळात ही रक्कम 16,000 रूपयांपर्यंत वाढली होती. 1981 साली ' पाथर्डी ' येथे भरलेल्या ' अखिल महाराष्ट्र वैदु समाजा ' च्या सभेत मुलींच्या खरेदी विक्रीची अनिष्ट प्रथा बंद करण्यात आली. वधुमूल्य घेणा-या वधुपित्यांना 1000 रूपयांपर्यंत दंड करण्यात आल्याची उदाहरणे आढळून आली. सातारमध्ये ' देज ' देण्याची पध्दत बंद झाली आहे. लग्न मुलीच्या दारात केले जाते. लग्नाचा खर्च दोन्ही पक्ष मिळून करतात.

6... या समाजात डोक्यात भोवरा असणारी मुलगी अपशकुनी समजली जाते. अशा मुलीचा पती मरतो अशी समजूत असल्याने या मुली माकडवाल्या जमातीस विकल्या जात. महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यातील ' सत्यशोधक वैदु सेवा संघ ' या संघटनेने ही प्रथा बंद पाडली आहे. ' समाज प्रबोधनाच्या ' कामासाठी या जमातीतील श्री यल्लप्पा वैदु यांना ' श्री अरुण लिमये ' पुरस्कार मिळाला आहे.

7. **लग्न पध्दती** ... सातारमध्ये वैदु लोक पारंपरिक पध्दतीने विवाह करीत नाहीत. या जमातीत ' समूह विवाह ' केले जातात. लग्न पंचायतीमध्ये ठरविले जाते. मुला मुलींची संमती घेतली जाते. ' मढी ' किंवा ' जेजुरीच्या ' यात्रेमध्ये विवाह ठरविले जातात. वर्षभरांत ठरलेली लग्ने ' सामुहिक विवाह ' पध्दतीने केली जातात. लग्नामध्ये ' सत्यशोधक समाजाच्या ' पध्दतीप्रमाणे तीन मंगलाष्टके म्हटली जातात व फुले उधळतात. विवाहात गोड जेवण दिले जाते.

8. **आंतरजातीय विवाह** ... ही जमात अंतर्विवाही आहे पण जमातीतील मुलगा अथवा मुलीने दुस-या जमातीतील जोडीदार निवडल्यास त्या मुलाला अथवा मुलीला जातीत घेतले जाते. अशा मुलांचा अथवा मुलीच्या पित्यास आर्थिक दंड केला जातो.

## वैदुंचे धार्मिक जीवन व अंधश्रध्दा.

पूर्वी ही जमात मातृसत्ताक जमात होती. या जमातीत दुर्गादेवी, मायाक्का, मरीआई, साती आसरा, या स्त्री देवतांची पूजा केली जाते. गावदेवीची पूजा केली जाते. हे लोक यतुक्रिया (जादुटोणा) वर विश्वास ठेवतात. देवतांना नवस बोलण्याची पध्दती आहे. सातारमधील वैदु शंकर व

दत्त, जेजुरीचा खंडोबा या देवांची पूजा करतानाही आढळतात. ' खंडोबा ' म्हणजेच तिरुवेंगडम् व वेंकटाचल् या दक्षिणेकडील कुरव प्रदेशांत रहाणा-या कुरव जमातीचा मूळ देव ' मुरूग ' आहे असे ते मानतात. लग्न, बारसे, मयतविधी, जन्मविधी यावेळी देवांची पूजा करतात. देवतांना बळी देतात. जगाला औषध देणारा वैदु स्वतः आजारी पडल्यानंतर वैद्यकीय उपचार न घेता, देव देवर्षी, नवस इ. करताना दिसतो. सातारमध्ये या जमातीच्या देव्हा-यावर पितळ, चांदी इ. धातूंचे देवांचे मुखवटे किंवा टाक दिसून येतात. व्यंकोबा, हनुमान, राम, कर्नाटकातील येरूकेरू ( धारवाड जिल्हा ) या गांवातील दुर्गादेवी, कर्नाटकातील बेळगांव जिल्ह्यातील ' कळोली ' या गांवातील ' रामस्वामी ' ( मारूती ) संकेश्वर येथील ' गुरूड ' ( गुरूदत्त ) सौंदत्तीची यल्लमादेवी, मायाक्का इ. देवांची पूजा करतात. हे लोक मुस्लीम संतांनाही मानतात. मुस्लीमांचा मोहरम सण यांच्यातही आहे. ' पीर ' ( पंजा ) बसवितात. या देवांच्या मूर्ती किंवा टाक ते चिकोडी या गावातून करून आणतात.

यल्लमकळताई, दुर्गम्मा, साती आसराया या देवतांना नवस बोलतात. आजारीपण दूर करणे, सांसारिक अडचणी दूर व्हाव्यात, व्यवसायात विकास व्हावा इ. कारणांसाठी नवस बोलला जातो. यल्लमकळताई, साती आसराया यांना पूर्वी प्रत्येक कुटुंबातर्फे सात बक-यांचा बळी दिला जाई. यामध्ये दोन बकरी सात आसरायांना, तीन बकरी दुर्गादेवीला आणि दोन बकरी जगदंबेला बळी देत असत. याशिवाय इतर नवसांना बकरीचा बळी देत. स्त्रिया नवस लक्षात ठेवण्यासाठी लुगडयाला गाठी मारतात. अशिक्षितपणामुळे नवस लक्षात रहात नाहीत म्हणून हा उपाय केला जातो. डाव्या बाजूला नवसाच्या बकरींची संख्या लक्षात रहाण्यासाठी व लुगडयाच्या उजव्या बाजूला नैवेद्य नारळाचे नवस लक्षात रहावेत म्हणून या गाठी मारण्याची पध्दती आहे. याशिवाय ' पारजीम ' म्हणजे किरकोळ नवस बोलले जातात. यामध्ये उदबत्ती, खडीसाखर, पेढे, मिठाई, फुटाणे, वजनाएवढा गूळ, साखर,बत्तासे, लिंबे, नारळ इ. चे नवस बोलले जातात. पूर्वी अंकव्वा, तायाम्मा या देवतांना महार अथवा मांगांकडून रेडयांचा बळी दिला जात असे. या लोकांमध्ये भगत नाही. वैदु लोक स्वतःच देवाची पूजा करून धार्मिक कृत्ये करतात व बळी देतात.

रेडयाचा बळी ... बकरी किंवा डुकराच्या नवसाने जर उद्देश सफल झाला नाही तर हे लोक रेडयांचा बळी देतात. अस्पृश्याकडून रेडा मारला जातो. देवाला नैवेद्य दाखवून हे मांस न शिजविता अस्पृश्यांना देऊन टाकतात. हे सर्व विधी नदीकाठी केले जातात. बळी दिलेल्या प्राण्यांचे रक्त एक खोल चर खणून त्यात सोडले जाते. देवाचे विधी उरकल्यानंतर हे लोक मांस शिजवून

खातात. उरलेले मांस मिठाच्या पाण्यात शिजवून वाळवले जाते व नंतर खाल्ले जाते. यानंतर हे लोक आंघोळ करून कपडे धुतात व घरी परत येतात.


या समाजात विटाळ मानण्याची प्रथा आहे. मासिक विटाळ पाच दिवस, बाळंतिणीचा विटाळ पंधरा दिवस मानतात. यानंतर घर सारवून, गोमूत्र शिंपडून विटाळ फेडला जातो व घर शुध्द केले जाते. हे लोक मढी, जेजुरी, येरूकेरू येथे यात्रेस जातात. या काळात स्त्रिया व मुले चार दिवस डोक्यावरून अंघोळ करतात. इतर गोष्टींना शिवत नाहीत. यासाठी लागणारा पैसा वर्षभर फिरून, व्यवसाय करून गोळा केला जातो.

जत्रेच्या ठिकाणी गाढवाचा बाजार भरतो. या लोकांमध्ये संचयी वृत्तीचा अभाव दिसून येतो. नवस फेडण्यासाठी कर्ज काढतात. यामुळे त्यांचे रहाणीमान निकृष्ट प्रतीचे झाले आहे. गरीब वैदुंना नवस फेडण्यासाठी इतर जातभाई पैसे गोळा करून मदत करतात. इ.स. 1984 मध्ये सत्यशोधक विचारसरणीच्या प्रभावामुळे जमातीच्या कार्यकर्त्यांनी ही पूजा सातारमध्येच सुरू केली. सध्या या जमातीत सर्व जमातीची मिळून पाचच बकरी मारली जातात. इतर नवसांचे प्रमाण कमी झाले आहे. रेडा व डुकरांचे बळी देणे बंद झाले आहे. डुकरांचे मटण जमातीत खाल्ले जात नाही. शंकर या देवाला पूर्वी प्रत्येक घरातून दोन बकरी बळी दिले जात. यावेळी बकरी कापणे, शिजविणे, बक-यांच्या पोटातून विशिष्ट पध्दतीने सर्व आतडी काढून त्याचा नैवेद्य दाखविणे, दिवसभर उपास करणे व सामूहिक घास सोडणे इ. क्रिया केल्यानंतरच जेवण केले जाते. हल्ली ही प्रथा कमी झाली आहे.

' तायम्मा ' ही देवी एकाच हाताची आहे. तिची मूर्ती नाही. कोरडया मातीची मूर्ती करून तिला अंडयाचा नैवेद्य दाखविला जातो. ' तायम्मा ' व ' यल्लम्मा ' देवीची पूजा जमातीतील थोडे लोकच करतात.

' अंगात येणे ' हा प्रकार सात आठ वर्षापूर्वी बंद झाला आहे. सध्या हे लोक जेजुरी, मढी, सौंदत्ती येथे यात्रेसाठी जातात. किरकोळ नवस फेडणे, जमात पंचायतीस हजर रहाणे, गाढवांचा व्यापार करणे, लग्न जमविणे, सुट्टीत वर्षाचा थकवा घालविणे इ. कामे तेथे केली जातात. या यात्रांमध्ये सत्यशोधक समाजाचे लोक सभा भरवून लोकांचे प्रबोधन करतात. यासाठी सुरूवातीस वृध्द लोकांचा विरोध झाला. पण जमातीमध्ये वैचारिक बदल घडवून आणण्यात व अंधश्रध्दा अनिष्ठ प्रथा दूर करण्यात ही सभा यशस्वी झालेली दिसते. हे लोक शहरातील इतर देवांची पूजा करतात. ' गणपती पूजन ' करतात.

नकाशा क्र० ५




वैदुंची जत्रांची गांवे

## स्त्रियांचा दर्जा.

सातारमधील या जमातीत स्त्रियामध्ये साक्षरता आढळते. स्त्रिया पुरूषांना व्यवसायामध्ये मदत करतात. मणि पोत विकणे, कृत्रिम दागिने करणे, स्टॉल चालविणे इ. व्यवसाय त्या करतात. वैदु पुरूष स्त्रियांना घरकामांत मदत करतात. स्त्रियांचा पारंपरिक दृष्टीकोन बदलला आहे. डॉक्टरी उपचार करतात. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया जमातीतील 80% स्त्रियांनी करून घेतली आहे. त्या मुलांना शाळेत पाठवितात. व्यवसायांत पुरूषांना मदत करून स्वतःचे आर्थिक उत्पन्न वाढवितात. स्वतःच्या पसंतीने जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य त्यांना आहे. वधुमूल्य प्रथा बंद झाली आहे. त्या पुनर्विवाह करू शकतात. त्यांना घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे. एकंदरित या समाजात स्त्रियांचा दर्जा चांगला आहे. जमातीमधील सामाजिक कार्यकर्त्यांनी, डॉक्टर्स, समाजसेवक पुरूष, स्त्रिया यांची व्याख्याने ठेऊन स्त्रियांमधील अंधश्रध्दा कमी केल्या आहेत. त्या स्वतःच्या व कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेतात.

**मनोरंजन** ... हे लोक टी.व्ही., रेडिओ, टेपरेकॉर्डर इ. च्या साह्याने मनोरंजन करतात. पूर्वीची गाणी, पारंपरिक नाच इ. आढळत नाहीत.

**मर्तिक प्रथा** ... ह्या लोकांत दफनविधी आहे. मृतास पूर्वी झोळीतून नेत असत. गोधडीच्या चार टोकापैकी दोन दोन टोके एकत्र करून बांबूस बांधली जातात. मृतास आंघोळ घातली जाते. यानंतर त्यास पद्मासन घातलेल्या स्थितीत बसवून स्मशानांत नेले जाते.

मृतास पुरण्यासाठी स्मशान भूमीत एक खड्डा खणला जातो. या खड्डयामध्ये देवळीसारखे एक भुयार खोदले जाते. या जागी मृतास बसविले जाते. मृत शरीराबरोबर पान, हळद, कुंकू, एक कच्चे अंडे, व शेरभर मीठ ठेवले जाते. प्रेतास कीड लागू नये म्हणून प्रेत लिंबाच्या पाल्यावर ठेवले जाते. त्यानंतर मग माती टाकून खड्डा बुजविला जातो. प्रेत नक्की कोठे आहे हे न कळल्यामुळे कोल्ही व कुत्री प्रेत फाडू शकत नाहीत. यादिवशी जमातीत दुखवटा पाळण्याची प्रथा आहे. प्रेत नेणा-या व खड्डा उकरणा-या लोकांना मयताच्या घरी जेवण देतात. दफन केल्यानंतर सर्व लोक मयत व्यक्तीच्या घरी येतात. तिथे दारात शेण ठेवलेले असते. या शेणावर पाय देऊन हे लोक हात पाय धुऊन दारात बसतात. या पाठीमागे त्यांना ' शुध्द करण्याची ' भावना असते. चहापान घेऊन हे लोक घरी जातात.

रीतीरिवाज, नवस इ. संबंधी आर्थिक व्यवहारासंबंधी निर्णय घेतले जातात. सध्या तरूण लोक ही जातपंचायतीच्या कामात लक्ष घालतात. वृध्दांचे मतपरिवर्तन करून जमातीच्या विकासासाठी कार्यक्रम ठरविले जातात.

## (ऊ) अभ्यासाचे निष्कर्ष.

सातारा येथील वैदु जमातीचा सामाजिक सर्वेक्षण व मुलाखात तंत्र वापरून समाजशास्त्रीय अभ्यास केला आहे. या अभ्यासातून पुढील निष्कर्ष हाती येतात.

(1) अतिप्राचीन काळापासून या जमातीचे अस्तित्व आहे. जुन्या वाङमयांमध्ये या जमातीचा उल्लेख आढळतो. आंध्रप्रदेशातील ' कुरवची ' या डोंगरी भागात रहाणा-या 'कुरव' अथवा ' कोरवा ' या जमातीतीलच वैदु ही एक भटकी आदिम जमात आहे. आंध्र प्रदेशात या जमातीस ' गोला ' म्हणतात. ' गोला ' ही जमात म्हणजेच महाराष्ट्रात तेलगु भाषा बोलणारी व भटकंतीचे जीवन जगणारी वैदु जमात आहे.

(2) या जमातीची भाषा तेलगु आहे. या भाषेस ' गोलारी ' किंवा ' गोलायाव ' असेही म्हणतात. ही भाषा द्रविडीयन आहे. हे लोक हनुमानाची पूजा करतात. हनुमान हा द्रविडांचा देव आहे. तसेच ही जमात प्रामुख्याने जंगलापासून मिळणा-या पदार्थांवरच आपली उपजीविका करत होती. त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, लग्न पध्दतीतील विधी, बळी द्यावयाची पध्दती, स्त्री देवतांची पूजा, देवकप्रथा, पूर्वजांचे टाक पूजण्याची पध्दती या सर्व गोष्टीवरून वैदु ही जमात द्रविडीयन असून आदिक जमात आहे हे सिध्द होते.

(3) या जमातीतील लोकांना लिपी अवगत होती. जुन्या जाडपत्रांवर ही जमात आपले औषधांचे ज्ञान लिहून पुढच्या पिढीस हे ज्ञान देत होती. काळाच्या ओघांत ही ताडपत्रे नष्ट झाली आहेत. जुन्या काळात हे लोक ' धूळपाटीवी ' तेलगु अक्षरे ( लिपी ) आपल्या लोकांना शिकवित होते. अशा शाळाही त्यांच्यात होत्या. यावरून त्यांना ' लिपीचे ज्ञान ' होते हे सिध्द होते. मात्र आज त्यांना ही लिपी येत नाही.

सावडण्याचा विधी तिस-या दिवशी असतो. यादिवशी दफन केलेल्या जागी दगड गोळा करून ठेवतात. त्यावर पाणी शिंपडून शेणकाला लावून लिंपतात. नंतर या जागेवर एक उंच दगड ठेवला जातो. घरी प्रेताच्या नांवाने एक दिवा लावून ठेवतात. घरी आल्यानंतर सर्व लोकांना ऐपतीप्रमाणे जेवण देण्याची प्रथा आहे.

विवाहित माणसाचा ' दहावा ' व ' तेरावा ' हे विधी केले जातात. या दिवशी बोकड कापून जमातीस जेवण दिले जाते. रात्री जमातीतील लोक एका ठिकाणी जमून दुखवटा व्यक्त करतात. एक व्यक्ती हातात सूप, ताट, व काठी घेऊन बसते. ही व्यक्ती ताटावर काठी आपटून इतर जातभाईंनी दिलेले दुखवटयाचे पैसे स्वीकारते. मयत व्यक्तीस उद्देशून ' तुझ्या मित्राने तुला एक रूपया दिला आहे तो तू मान्य करून स्वर्गात जा ' असे म्हटले जाते. मृताच्या मुलाकडून जमातीस जेवण दिल्यानंतर हा विधी पूर्ण होतो.

मयत विधीमध्ये स्त्रिया व मुलांना प्रवेश नसतो. काही वेळा मृत व्यक्तीच्या श्राध्दविधी वर्षाने केला जातो. लग्नामध्ये मृत व्यक्तीचा टाक करून पूजा करतात. त्याला नवीन धोतर आणले जाते. ताटात विस्तव ठेऊन त्यावर ऊद टाकून मृताचा मान राखला जातो.

सध्या या जमातीत विवाहित मृतास तिरडीवरून नेले जाते. मृताचा आत्मा सदैव भोवती वास करतो अशी समजूत आहे. एकंदरित आदिम समाजातील प्रथाच या लोकात दिसतात.

## जातीपंचायतीचे वर्चस्व.

या जमातीत जातपंचायतीचा प्रभाव आहे. जातपंचायतीचे प्रमुखपद हे वय, शहाणपण, व प्रतिष्ठेनुसार ठरते. या पंचायतीत लग्ने ठरविणे, जमातीतील कौटुंबिक व विवाहविषयक अडचणींबद्दलचे खटले चालविले जातात. सातारमध्ये ' मे ' महिन्यात सर्व वैदु एकत्र येतात. यावेळी वर्षभरातील कामांचा आढावा घेतला जातो. जमातीतील खटले चालविले जातात. जातपंचायतीचा निर्णय मानला जातो. न पाळणा-यास शिक्षा दिली जाते. शिक्षांमध्ये आर्थिक दंड, जमातीस जेवण देणे इ. प्रकार असतात. ही जमात गुन्हेगार जमात नाही. ब्रिटीश काळात या जमातीला पोलीसांचा त्रास झालेला आढळतो. आता तो होत नाही.

ही जमात अस्पृश्यता पाळते. अस्पृश्यांशी रोटी व्यवहार केल्यास त्या व्यक्तीस जातीबाहेर काढले जाते. अशा व्यक्तीस पंचायतीसमोर जावे लागते. पंचायतीत धार्मिक प्रथा,

रीतीरिवाज, नवस इ. संबंधी आर्थिक व्यवहारासंबंधी निर्णय घेतले जातात. सध्या तरूण लोक ही जातपंचायतीच्या कामात लक्ष घालतात. वृध्दांचे मतपरिवर्तन करून जमातीच्या विकासासाठी कार्यक्रम ठरविले जातात.

## (ऊ) अभ्यासाचे निष्कर्ष.

सातारा येथील वैदु जमातीचा सामाजिक सर्वेक्षण व मुलाखात तंत्र वापरून समाजशास्त्रीय अभ्यास केला आहे. या अभ्यासातून पुढील निष्कर्ष हाती येतात.

(1) अतिप्राचीन काळापासून या जमातीचे अस्तित्व आहे. जुन्या वाङमयांमध्ये या जमातीचा उल्लेख आढळतो. आंध्रप्रदेशातील ' कुरवची ' या डोंगरी भागात रहाणा-या 'कुरव' अथवा ' कोरवा ' या जमातीतीलच वैदु ही एक भटकी आदिम जमात आहे. आंध्र प्रदेशात या जमातीस ' गोला ' म्हणतात. ' गोला ' ही जमात म्हणजेच महाराष्ट्रात तेलगु भाषा बोलणारी व भटकंतीचे जीवन जगणारी वैदु जमात आहे.

(2) या जमातीची भाषा तेलगु आहे. या भाषेस ' गोलारी ' किंवा ' गोलायाव ' असेही म्हणतात. ही भाषा द्रविडीयन आहे. हे लोक हनुमानाची पूजा करतात. हनुमान हा द्रविडांचा देव आहे. तसेच ही जमात प्रामुख्याने जंगलापासून मिळणा-या पदार्थांवरच आपली उपजीविका करत होती. त्यांच्या चालीरीती, रूढी, परंपरा, लग्न पध्दतीतील विधी, बळी द्यावयाची पध्दती, स्त्री देवतांची पूजा, देवकप्रथा, पूर्वजांचे टाक पूजण्याची पध्दती या सर्व गोष्टीवरून वैदु ही जमात द्रविडीयन असून आदिक जमात आहे हे सिध्द होते.

(3) या जमातीतील लोकांना लिपी अवगत होती. जुन्या जाडपत्रांवर ही जमात आपले औषधांचे ज्ञान लिहून पुढच्या पिढीस हे ज्ञान देत होती. काळाच्या ओघांत ही ताडपत्रे नष्ट झाली आहेत. जुन्या काळात हे लोक ' धूळपाटीवी ' तेलगु अक्षरे ( लिपी ) आपल्या लोकांना शिकवित होते. अशा शाळाही त्यांच्यात होत्या. यावरून त्यांना ' लिपीचे ज्ञान ' होते हे सिध्द होते. मात्र आज त्यांना ही लिपी येत नाही.

(4) आंध्रमधून महाराष्ट्रांत येत असताना या लोकांनी जंगलाचा आधार घेतला. जंगलातील मिळणा-या पदार्थांवरच हे लोक आपली उपजीविका करत असल्याने त्यांनी औषध तयार करून विकणे व शिकार करणे हे व्यवसाय स्वीकारले. हेच त्यांचे पारंपरिक व्यवसाय बनले.

(5) इतर भटक्या जमातींप्रमाणेच या लोकांनी महाराष्ट्रांत स्थायिक होण्यासाठी शहरे निवडलेली आहेत. उपजीविकेची निश्चित खात्री असल्याने त्यांनी ही ठिकाणे निवडली आहेत.

(6) या जमातीत ' आते मामे भावंडांचा विवाह प्रचलीत आहे. त्यास हे लोक ' होळ ' असे म्हणतात.

(7) या जमातीत स्त्रिया कुंकू व मंगळसूत्र वापरतात. सुपारी, पान, हळदी कुंकू या गोष्टींना या समाजात महत्व आहे.

(8) या जमातीत लग्नाच्या वेळेस देवक पुजण्याची पध्दती आहे. आजही हे लोक देवक प्रथा मानतात. पूर्वजांच्या आत्म्यास देव मानतात.

(9) ही जमात अंतर्विवाही आहे. पण मुलगा किंवा मुलगी यांनी जमाती बाहेरील मुलगी मुलग्याशी विवाह केला तर ते त्या व्यक्तीस आपल्या जमातीत घेतात. अशा मुलाच्या अथवा मुलीच्या बापास आर्थिक दंड भरावयास लागतो.

(10) ही जमात बहुपत्नी विवाही आहे. आजही या जमातीत अशी उदाहरणे दिसून येतात.

(11) लग्न लावण्यासाठी या जमातीत ब्राह्मण लागत नाही. ' धोबी ' किंवा ' न्हावी ' हे लोक त्यांचे लग्न लावतात.

(12) या जमातीत वधुमूल्य प्रथा आहे - ही गोष्ट त्यांचे आदिमपण सिध्द करते.

(13) या जमातीत स्त्रिस पुनर्विवाह करतो येतो. अशी स्त्री आपल्या पतीच्या भाऊबंदाशी विवाह करू शकत नाही. तिला धार्मिक गोष्टीत भाग घेता येत नाही.

(14) या जमातीत स्त्रिस पती निवडण्याचा अधिकार आहे. घटस्फोट घेण्याचा अधिकार आहे. पतीनिधनानंतर स्त्री ही कुटुंब प्रमुख होऊ शकते. स्त्री प्रधान कुटुंब व्यवस्थेचे अवशेष आजही या जमातीत टिकून आहेत.

(15) या जमातीत पूर्वी स्त्रिस मानाचा दर्जा आहे. ही जमात स्त्री देवता, गायदेवी यांची पूजा करते. स्त्रियांना पुरूषांप्रमाणे अधिकार आहेत. पूर्वी ही जमात मातृसत्ताक कुटुंब पध्दती मानणारी होती. बदलत्या सामाजिक परिस्थितीत ही जमात आज पुरूषप्रधान बनलेली दिसते.

(16) या लोकांचा भूत खेतांवर, जत्रांवर विश्वास आहे. यल्लम्मा, तायाम्मा, साती आसराया, दुर्गादेवी इ. देवतांची ते पूजा करतात. या जमातीत देवास नवस बोलण्याची व बकरी, कोंबडे, डुक्कर, रेड इ. प्राणी बळी देण्याची प्रथा आहे. पूर्वजांचा टाक ते देव्हा-यांवर बसवितात.

(17) या जमातीत विटाळ मानण्याची पध्दती आहे. बाळंतिणीचा पंधरा दिवस व मासिक विटाळ पाच दिवस मानला जातो.

(18) या जमातीत दफनविधी आहे. व्यक्ती मेल्यानंतर तिचे प्रेत ते पुरतात. या जमातीत श्राध्दविधी नाही.

(19) हे लोक मुस्लीम संतांना मानतात. ' मोहरम सण ' साजरा करताना ' पंजा ' बसवितात. यावरून हिंदु व मुस्लीम यांच्या प्रचलीत धर्मविधी पध्दती यांच्यात रूढ झाल्या आहेत हे सिध्द होते.

(20) गांवगाडयातील कुंभार जातीस आपले भाऊबंद मानण्याची पध्दती या जमातीत आहे. जर एखादी वैदु स्त्री रात्री मुक्काम करावा लागला तर तो कुंभाराच्या घरी करते. कारण कुंभार जातीस ती आपले माहेर मानते. कुंभार हा मातीची भांडी बनवितो. नवीन निर्मिती करतो म्हणून त्याच्यात परमेश्वरी अंश आहे अशी या जमातीत समजूत आहे.

(21) हे लोक अंधश्रध्दाळू आहेत. शकुन अपशकुन, नवस इ. गोष्टीवर ते विश्वास ठेवतात.

(22) या जमातीत स्त्री पुरूषांचा व्यभिचार मान्य केला जात नाही. या गुन्ह्यासांठी कडक शिक्षा आढळतात.

(23) वैदु लोकांना इतर जाती स्पृश्य मानतात. वैदु लोक अस्पृश्यता पाळतात. त्यांच्याशी रोटीव्यवहार केल्यास अशा वैदु व्यक्तीस वाळीत टाकले जाते.

(24) ही जमात पूर्वीपासून आजपर्यंत गुन्हेगार जमात म्हणून गणली गेलेली नाही. तरीसुध्दा गांवगाडयांमध्ये उपजीविकेसाठी फिरताना या जमातीस पूर्वी गुन्हेगार जमातींना जसा त्रास होत होता त्याच पध्दतीने त्रास सहन करावा लागला आहे.

(25) ही जमात स्वतःस हिंदु धर्मिय मानते. हिंदु सवर्णांशी यांचा रोटी व्यवहार चालतो. मात्र हिंदु वर्ण व्यवस्थेत, गांवगाडयांत या जमातीस स्थान मिळालेले नाही.

(26) या जमातीत जातपंचायतीचा प्रभाव आहे. जातपंचायतीचा निर्णय ते मानतात.

## (ए) वैदुंची सद्य:स्थिती.

सातारमधील वैदुंना ख्रिस्ती मिशन-याकडून मिळालेले शिक्षण व सातारा शहराचा प्रभाव यामुळे त्यांची जीवन पध्दती बदललेली आहे.

1. त्यांच्यातील जुन्या अंधश्रध्दा, रूढी, परंपरा नष्ट होत चालल्या आहेत.
2. त्यांच्यात शैक्षणिक जागृती झाली आहे.
3. बालविवाह पध्दती, बहुपत्नी विवाह, वधुमूल्य प्रथा, अंगात येणे इ. अनिष्ट पध्दती नष्ट होत चालल्या आहेत.
4. या लोकांची घराची रचना, पारंपरिक पोशाख, जेवण, भाषा बदलली आहे.
5. या लोकांचा पारंपरिक औषध विक्रीचा व्यवसाय बंद झाला आहे. त्याऐवजी त्यांनी कटलरी व्यवसाय, रिक्षा व्यवसाय, नोकरी इ. व्यवसाय स्वीकारले आहेत.
6. हे लोक कुटुंब नियोजनाचा अवलंब करतात.
7. स्वत:ची स्थावर मालमत्ता करण्याची वृत्ती त्यांच्यात निर्माण झाली आहे.
8. त्यांना राजकीय क्षेत्रांत स्थान मिळालेले नाही.
9. परंपरागत व्यवसाय नष्ट झालेले आहेत पण नवीन व्यवसायांसाठी पुरेशा प्रमाणांत शासकीय मदत मिळालेली नाही.
10. बालवाडी सुरू केलेली आहे. प्रौढ शिक्षण वर्ग चालू नाही.
11. वैदु ही जमात भटकी असली तरी सातारमध्ये ती स्थायिक झालेली दिसते.